महसूल व वन विभाग

**जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव**

**महसूल शाखा**

आकाशवाणी केंद्राजवळ, जळगाव 425 001

दुरध्वनी क्रमांक - 0257- 2220152 (एक्सटें. 310) फॅक्स क्रमांक 0257-2220500

ई मेल आयडी - rev.jalgaon@gmail.com


क्रमांक. जमीन/1/विशे/एसआर/28/2017 दिनांक :२७ जुन. 2017

वाचले :

1. महाराष्ट्र जमिन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) अधिनियम 2014 क कलम 42 अ, 47 अ
2. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम 2014 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 37, दिनांक 22/12/2014
3. श्री. आशिष चंदुलाल पटेल व इतर रा. विश्राम 78, जय नगर, ओंकारेश्वर मंदिराजवळ, जळगांव ता. जि. जळगांव यांचा दिनांक 09.03.2017 रोजीचा अर्ज.
4. जळगांव शहर महानगरपालिका यांचेकडील पत्र No.T.P./B.P./0559 दिनांक 29.09.2015

## ना हरकत प्रमाणपत्र

ज्याअर्थी, श्री. आशिष चंदुलाल पटेल व इतर, रा. जळगांव यांनी त्यांचे मालकीच्या मौजे मेहरुण, ता. जळगाव येथील स.नं. 436/अ/1 चे क्षेत्र 20405.00 चौ.फु. या जमिनीस रहिवास व वाणिज्य प्रयोजनार्थ अकृषिक परवानगी मिळणेकामी विनंती केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव यांनी त्यांचेकडील पत्र No.T.P./B.P./0559 दिनांक 29.09.2015 अन्वये श्री आशिष चंदुलाल पटेल व इतर, रा. जळगांव यांना मौजे मेहरुण, ता. जळगाव येथील स.नं. 436/अ/1 चे क्षेत्र 20405 चौ.फु. क्षेत्राकरीता रहिवास व वाणिज्य प्रयोजनार्थ अभिन्यास मंजूर केलेला आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) अधिनियम 2014 अन्वये सुधारणा केल्यानुसार कलम 42 (अ) नुसार श्री. आशिष चंदुलाल पटेल व इतर यांना मौजे मेहरुण ता. जळगाव येथील स.नं. 436/अ/1 चे रहिवास व वाणिज्य प्रयोजनासाठी बदल करण्यात आलेल्या क्षेत्र 20405.00 चौ.फु. या वार्षिक बिनशेती दर व रुपांतर कराची आकारणी करुन सनद दयावयाची आहे.

आणि ज्याअर्थी, मौजे मेहरुण, ता. जळगाव येथील स.नं. 436/अ/1 चे क्षेत्र 20405.00 चौ.फु. या जमिनीचा 7/12 उतारा पाहता सदर जमीन भोगवटादार वर्ग-1 ची दिसुन येते.

आणि ज्याअर्थी, जमिनीचे धारक यांनी बिनशेती सारा र.रु.7,938/- व रुपांतरित कर र.रु.39,690/- अशी एकूण र.रु.47,628/- मात्र दिनांक 12 जुन 2017 रोजी चलनाद्वारे शासनास भरणा केलेली आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता 1966 चे कलम 42 अ (1) (अ) नुसार जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव यांनी दिलेल्या परवानगीतील अटी व शर्तीस अधीन राहून व या कार्यालयाचे खालील अटी / शर्तीचे अधीन राहून मौजे मेहरुण, ता. जळगाव येथील स.नं. 436/अ/1 चे क्षेत्र 20405.00 चौ.फु. **क्षेत्राकरीता रहिवास व वाणिज्य प्रयोजनार्थ** विकासाची परवानगी देणेबाबत नाहरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

अटी व शर्ती

1) सदर बिनशेती साऱ्याचा दर दिनांक 01/08/2006 नंतर लागू होणाऱ्या सुधारीत दरानुसार बदलणेस पात्र राहील.

2) स्थानिक प्राधिकरणाकडून विकासाची परवानगी मिळाल्यानंतर अर्जदार यांनी ज्या दिनांकापासून जमिनीच्या वापरात बदलास सुरुवात केली असेल अशा दिनांकापासून 30 दिवसाच्या आत त्याबाबत **तलाठी मेहरुण व तहसिलदार जळगाव** यांना लेखी कळविणे बंधनकारक राहील. तसे न केल्यास तो अर्जदार अकृषिक आकारणी देण्याबरोबरच आणखी पंचवीस हजार रुपयांचा द्रव्यदंड किंवा अकृषिक आकारणीच्या चाळीस पट इतकी रक्कम, यापैकी जी अधिक असेल ती रक्कम देण्यास पात्र राहील.

3) प्रश्नाधिन जमिनीचा ज्या तारखेपासून बिनशेती वापर सुरु केलेला आहे त्या तारखेपासून 20405.00 रहिवास व वाणिज्य वापराच्या क्षेत्रावरील प्रतिवर्षी भूधारक/भूखंडधारक यांनी प्रती चौ.मी. ला रु. 4.18.8 पैसे या दराने बिनशेती सारा भरावा. तसेच बिनशेती साऱ्यावर लागू असल्यास स्थानिक उपकर भरावा लागेल. सदरचा बिनशेती दर हा सुधारीत दर लागू होईपावेतो अंमलात राहील त्यानंतर दरात काही सुधारणा झाल्यास सुधारीत दराप्रमाणे आकारणी करणेत येईल. ती पूर्वलक्षी प्रभावाने करणेत येईल.

4) जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव यांचेकडून विकासाची परवानगी मिळाल्यानंतर व सिमांकित अभिन्यास मंजूर झाल्यानंतर अर्जदार यांनी 30 दिवसांचे आत नियमान्वये विहीत करण्यात आलेल्या नमुन्यात **तहसिलदार जळगाव** यांचेकडून सनद प्राप्त करुन घ्यावी.

5) सदरच्या जमिनीच्या मालकी हक्काबाबत संबंधित जमीनमालक जबाबदार राहील. याबाबत महसुल विभाग/ महसूलअधिकारी जबाबदार राहणार नाहीत.

6) प्रस्तुत ना हरकत प्रमाणपत्र दिल्यानंतरही सदर जमीन वतन/ भोगवटादार वर्ग 2 संवर्गातील असल्याचे सिध्द झाल्यास व त्यापोटी प्रचलित नियमाद्वारे नजराणा/ अनर्जित रक्कमेतील विशिष्ट हिस्सा शासनास देय होत असल्याचे सिध्द झाल्यास अशा रक्कमेची वसूली ही बाब निदर्शनास येईल त्यावेळेच्या चालु बाजारमुल्याचे आधारे तत्कालीन जमीन धारकाकडून/ मालकाकडून वसूल करण्यात येईल. ही रक्कम भरण्यास तत्कालीन जमीन धारकाकडून / मालकाकडून कसूर केलेस ती जमीन महसूलाच्या थकबाकीप्रमाणे सक्तीने वसूल करण्यात येईल.

7) अर्जदार यांनी सदर जमिनीबाबत दिलेली माहिती चुकीची आढळल्यास मौजे मेहरुण ता.जळगाव येथील स.नं. 436/अ/1 चे क्षेत्र 20405.00 चौ.फु. यास दिलेले नाहरकत प्रमाणपत्र रद्द समजण्यात येईल.

8) प्रस्तुत मिळकतीची मालकी व वापर अनुज्ञेयता याबाबत अर्जदार व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था यांची जबाबदारी राहील.

COLLECTOR JALGAON

स्वाक्षरीत/-
(किशोरराजे निंबाळकर)
जिल्हाधिकारी जळगाव

प्रति,
श्री. आशिष चंदुलाल पटेल व इतर, रा. विश्राम 78, जय नगर, ओंकारेश्वर मंदिराजवळ, जळगांव ता. जि. जळगांव

प्रत : आयुक्त, जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव यांचेकडेस पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

प्रत : तहसिलदार जळगाव

3/- अर्जदाराने रक्कम भरलेबाबत चलनाची प्रत व मंजूर सिमांकित नकाशाच्या प्रती सादर केल्यानंतर 30 दिवसाचे आत त्यांना विहित नमुन्यात सनद देण्याची दक्षता घ्यावी.

प्रत : सहाय्यक संचालक, नगररचना मुल्यांकन, जळगाव यांचेकडेस माहितीसाठी

प्रत : उपअधिक्षक भूमी अभिलेख, जळगाव यांचेकडे बिनशेती सनद मोजणी अंती क.जा.प. पत्रक करणेबाबतचे पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत : तलाठी, मेहरुण यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

जिल्हाधिकारी जळगाव करिता